**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 13.10.2024** **वार – रविवार**

---

**<u>माझी शाळा सुंदर शाळा</u>**

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या स्पर्धेत विभाग स्तरावर अ आणि ब वर्ग महानगरपालिका क्षेत्रातील खजागी शाळा गटात पुण्यातील डेक्कन एज्युकेशन सोसयटीच्या टिळक पथावरील न्यू इंग्लिश स्कूलला प्रथम क्रमांकाचे 21 लाख रुपयांचे पारितोषिक जाहिर झाले आहे. तर नागपूर मधील सरस्वती विद्यालयला द्वितीय तर पुण्यातीलच शिवाजी मराठा हायस्कूलला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक जाहीर झाले आहे. शासकीय गट विभागात पुण्यातील पीएमसी स्कूल विनी 16 या शाळेला प्रथम, नाशिकमधल्या एनएमसी स्कूल क्रमांक 18 या शाळेला द्वितीय; आणि पुण्यातीलच पीएमसी स्कूल विनी 1 या शाळेला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक जाहीर झाले आहे.

**<u>लोकार्पण</u>**

पुणे मेट्रो, नदी सुधार प्रकल्प यासारख्या विकास कामांच्या माध्यमातून शहराचा चेहरा मोहरा बदलत आहे असं प्रतिपादन केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज पुण्यात केलं. आमदार माधुरी मिसाळ यांच्या प्रयत्नातून पु. ल. देशपांडे उद्यानात विकसित करण्यात आलेल्या कलाग्रामचं लोकार्पण मोहोळ यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. कलाग्राममधून विविध कलाकारांना आपले कलाविष्कार सादर करण्याची संधी मिळेल, या भव्य कलाग्राममुळे पुण्याच्या कला विश्वात वैभवात निश्चितच भर पडली आहे, असं ते म्हणाले.

**<u>स्पर्धा</u>**

पुणे महापालिकेच्या उद्यान विभागातर्फे दिवाळीनिमित्त किल्ले स्पर्धा आयोजित केली जाते. यंदाही २८ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर या कालावधीत, छत्रपती संभाजी राजे उद्यानात ही स्पर्धा होणार आहे. यासाठी तीन विभाग केले असून प्रवेश शुल्क ५ ते १० रुपये आहे, अशी माहिती मुख्य उद्यान अधीक्षक अशोक घोरपडे यांनी दिली. वाढत्या शहरीकरणामुळे मुलांना किल्ला करण्यासाठी जागा उपलब्ध नसते; त्यांना किल्ले तयार करण्यासाठी जागा मिळावी आणि त्यांच्या मनात आवड निर्माण व्हावी या उद्देशाने पुणे महापालिका प्रत्येक वर्षी ही स्पर्धा आयोजित करत असंते. यंदा स्पर्धेचं तिसावं वर्ष आहे.

<u>Pcmc</u>

पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील; पाच लाख रुपयांहून जास्त थकीत कर असणाऱ्यांवर कर आकारणी आणि कर संकलन विभाग कारवाई करणार आहे. या करदात्यांची यादी महापालिकेने तयार केली आहे. शहरातील २ हजार २२ मालमत्ताधारकांकडे प्रत्येकी पाच लाखाहून अधिक रक्कमेच्या कराची थकबाकी असून हा एकंदर थकीत कर २८० कोटी ६८ लाखांपेक्षा जास्त आहे. संबंधित मालमत्तांधारकांनी येत्या दहा दिवसांमध्ये आपल्या थकीत रकमेचा भरणा न केल्यास मालमत्तांवर जप्तीची कारवाई सुरू करण्याच्या सूचना पालिका प्रशासनाने क्षेत्रीय कार्यालयांना दिल्या आहेत.

**<u>भोंडला</u>**

पुण्यातील मातृशक्ति संस्थेच्या वतीने नवरात्रउत्सवानिमित्त आज संध्याकाळी गरवारे महाविद्यालयाच्या मैदानावर सर्व वयोगटाच्या महिला आणि मुलींसाठी  महाभोंडल्याच  आयोजन करण्यात आल आहे. यावेळी प्रसिद्ध अभिनेत्री गिरिजा ओक - गोडबोले आणि मुंबई तरुण भारत दैनिकाच्या उपसंपादिका योगीता साळवी या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत.

**कारवाई**

पुण्यात बनावट औषधांच्या विक्रीच्या अनेक घटना उघडकीला आल्या असून अन्न आणि औषध प्रशासनाने या प्रकरणी मोहीम हाती घेतली आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील तीन औषध विक्रेत्यांवर मोठी कारवाई करत त्यांच्याकडून ५० हजार रुपये किमतीची बनावट औषधे जप्त करण्यात आली आहेत. आजार बरा करण्याचा दावा करून हे विक्रेते औषधांची विक्री करतात. कुठलीही अधिकृत परवानगी न घेता या औषधांची विक्री केली जाते. या बनावट औषधांमुळे उपाय होण्यापेक्षा अपाय होण्याचा धोका जास्त असतो. त्यामुळे संबंधित दुकानांवर कारवाई केली जात असल्याचं पुणे अन्न औषध प्रशासन विभागाचे सहआयुक्त गिरीश हुकरे यांनी सांगितलं. यंदा एप्रिलपासून आतापर्यंत तीन औषध विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली आहे.

**आंदोलन**

धनगर समाजासाठी अनुसूचित जमातीचं आरक्षण तातडीने लागू करण्याचा शासन निर्णय उद्याच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत काढावा, या मागणीसाठी सकल धनगर समाजातर्फे आज पुण्यात ढोल-वादन आंदोलन करण्यात आलं. सारसबागेजवळील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुतळ्याला अभिवादन करून धनगर समाजबांधवांनी एसटी आरक्षण लागू करण्याची मागणी केली. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा निर्णय तातडीने घ्यावा अशी मागणी समन्वयक ॲडव्होकेट विजय गोफणे यांनी केली.

**बाजार समिती**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून 75 ते ऐंशी ट्रक फळभाज्यांची आवक झाली. कोबी, मटार, गाजर, फ्लॉवर या भाज्या महागल्या आहेत. तसंच पालेभाज्याही तेजीत आहेत. फळ बाजारात मोसंबी चिकू आणि पपईचे भाव वधारले आहेत. मागणी फारशी नसल्याने जवळपास सर्वच फुलांचे भाव खाली आले आहेत.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज आकाश अंशतः ढगाळ होतं; उद्याही असंचं वातावरण राहून हलक्या पावसाचीही शक्यता आहे. कमाल तापमान 32 अंशांच्या आसपास असेल.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**